नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष - ४ थे<br>Year - 4rd | अंक - १४२<br>Issue - 142 | वार - शनिवार दि. १७ ऑक्टोबर २०२६<br>Blow- Saturday Date 17 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |

# जोपर्यंत संविधान आहे तोपर्यंत निर्णय संसदेत होणार

## हा भारत आहे, पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश नाही; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये नागरिकशास्त्र आणि संवैधानिक मूल्यांवर आधारित 'स्मार्ट नागरिक' आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जी-वनावर आधारित 'विद्यार्थी प्रेरणा' पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आलं. सुजाण नागरिक-सक्षम भारत (स्मार्ट नागरिक) या उपक्रम अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी या पुस्तिका तयार करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमात जोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं संविधान आहे, तोपर्यंत निर्णय संसदेतच होतील, असं स्पष्ट केलं. रिजीम किंवा सत्ता निवडणुकीच्या माध्यमातूनच बदलेलं असंही देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हा भारत आहे, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका आणि नेपाळ नाही. त्यांच्याकडे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं संविधान नाहीये, जोपर्यंत संविधान आपल्याकडे आहे, तोपर्यंत निर्णय संसद घेईल, इतकी ताकद संविधानात आहे. गेल्या काही वर्षात अनेकदा संविधानावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला, लोकशाहीवर हल्ल्याचा प्रयत्न झाला. मात्र, हे संविधान इतकं मजबूत आहे की भारताच्या लोकशाहीला कोणी हात लावू शकलं नाही, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

जे कोणी हे मनसुबे घेऊन बसलेले आहेत, या भारतातही पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ किंवा श्रीलंकेसारखी स्थिती आम्ही आणू, त्यांनी हे लक्षात ठेवलं पाहिजे.या देशामध्ये या संविधानानं प्रत्येकाला न्याय मिळवण्याचा अधिकार दिला आहे. संविधानिक मार्ग न्याय मिळू शकतो, तो न्याय मिळवण्याचा प्रयत्न करा. कोणी असंविधानिक मार्गानं गेला तर त्याचं काय करायचं हे संविधानानं सांगून ठेवलंय अशा प्रकारचं संविधान आपल्याला मिळालाय, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

'स्मार्ट नागरिक' आणि 'विद्यार्थी प्रेरणा' पुस्तकांमध्ये सकारात्मक शक्ती म्हणून विद्यार्थी प्रेरणा घेतील ज्यातून स्मार्ट नागरिक अशी संकल्पना मांडण्यात आली आहे. भारताचे संविधान आजही, पुढील ३०० वर्षांनंतर हेच संविधान रिलेव्हन्ट असणार आहे.संविधानाने दिलेली मूल्यं कालजयी आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी यांनी जगातील सगळ्या देशातील संविधानाचा विचार केला आणि देशातील मूल्यांचा विचार करत, संघर्ष करत, संवेदनशीलतेतून संविधान निर्माण केले आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गीता, बायबल, कुराण यापेक्षा संविधान महत्त्वाचे आहे असं सांगितलं. संविधानानं प्रत्येकाला न्याय देण्याची व्यवस्था निर्माण केली आहे.आपला देश एक हजार वर्ष गुलामीत होता कारण आपण समाजाची तत्व आपण विसरलो. असमानता तयार केली आणि आपल्याला गुलामगिरीकडे नेले. परंतु संविधानानं समता प्रस्थापित करुन दाखवली. संविधान शक्य डॉक्युमेंट नाही, संधीची समानता देखील आणतं. एवढ्या मोठ्या देशात जाती पाती धर्म, भाग आ-हेत, यांना एकत्र बांधून कसे ठेवता येऊ शकतं हे संविधानाने सांगितले आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# एमपीएससी अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सतीश वाघोले यांच्याकडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांमधील पेपरफुटी आणि गैरप्रकाराच्या मुद्यांवर विद्यार्थ्यांनी आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासाठी पुण्यात आंदोलन केलं होतं. राज्य सरकारनं चौकशीसाठी समिती स्थापन करण्याचं आश्वासन दिल्यानंतर आणि अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी रजेवर जाण्याचा निर्णय घेतल्यानं विद्यार्थ्यांनी पुण्यातील आंदोलन मागं घेतलं होतं. विवेक भीमनवार रजेवर असल्यानं त्यांच्या रजेच्या काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य सतीश बबन वाघोले यांच्याकडे अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार दिला आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्यावतीनं हे आदेश जारी करण्यात आले आहेत.



महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे अन्न व औषध प्रशासनाची औषध निरीक्षक पदाची परीक्षा घेण्यात आली होती. त्या परीक्षेचा पेपर फुटल्याचं समोर आल्यानंतर आयोगातील काही अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या औषध निरीक्षक पदाचा पेपर फुटल्याचं स्पष्ट होताच विद्यार्थ्यांनी आयुक्त विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती.

राज्य सरकारच्यावतीनं विद्यार्थ्यांसोबत चर्चा करण्यात आली होती. मात्र, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीनं घेतल्या जाणाऱ्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी १० दिवस पुण्यात आंदोलन करण्यात आलं होतं. हे आंदोलन सोडवण्यासाठी राज्य सरकारकडून मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी पुण्यात विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली होती. विद्यार्थ्यांनी आंदोलन मागं घेण्यापूर्वी विवेक भीमनवार यांनी रजेवर जाण्याचा निर्णय घेतला होता. विवेक भीमनवार रजेवर गेल्यानं आता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य सतीश बबन वाघोले यांच्याकडे अध्यक्षपदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे.

सतीश वाघोले हे सप्टेंबर २०२६ मध्येच महाराष्ट्र लोकसेवा आयोगात सदस्य म्हणून दाखल झाले होते. ७ सप्टेंबरला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य म्हणून विवेक भीमनवार यांनीच सतीश वाघोले यांना सदस्य म्हणून गोपनीयतेची शपथ दिली होती. आता एका महिन्यानंतर बदलेल्या परिस्थितीमुळं सतीश वाघोले यांच्यावर अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यातआ ला आहे.

महाराष्ट्र सरकारकडून पुण्यातील विद्यार्थी आंदोलकांसोबत चर्चा करताना आयोगातील गैरप्रकार आणि पेपरफुटीसंदर्भात चौकशी समिती स्थापन करण्याचा शब्द देण्यात आला होता, त्यानुसार चौकशी आयोगाची अधिसूचना काढण्यात आली आहे. निवृत्त न्यायमूर्ती दिलीप भोसले चौकशी आयोगाचे अध्यक्ष असतील. निवृत्त न्यायमूर्ती पी. डी. नाईक यांच्यासह पाच सदस्यांचा आयोगात समावेश आहे. तुकाराम मुंढे, गणेश पाटील आणि लखामी गौतम यांचा आयोगात समावेश आहे.

# हवामानाचा मोठा इशारा! १६ राज्यांत पावसाचा रेड अलर्ट



### नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : हवामान विभागाने पुन्हा एकदा १६ राज्यांना रेड अलर्ट जारी केला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, १७ ऑक्टोबर रोजी अर्थात उद्या उत्तर प्रदेश, दिल्ली, बिहार आणि झारखंडसह १६ राज्यांसाठी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या काळात ताशी ८० किलोमीटर वेगापर्यंतच्या सोसट्याच्या वेगाने वारा वाहण्याची शक्यता आहे. डोंगराळ भागातील परिसरांना भूस्खलनाचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, छत्तीसगड, ओडिशा, हिमाचल प्रदेश, आंध्र प्रदेश आणि केरळमध्ये तीव्र वादळ येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तीन राज्यांसाठी हिमवृष्टीचा इशाराही देण्यात आला आहे. याशिवाय, पूर्व भारतातील राज्यांमध्ये मेघगर्जना आणि विजांचा कडकडाट होऊ शकतो. दक्षिण भारतात २२ ऑक्टोबरपर्यंत पावसामुळे हाहाकार माजण्याची शक्यता आहे. दरम्यान, पावसामुळे उत्तर भारतातील तापमान ५ ते ६ अंशांनी कमी होण्याची दाट शक्यता आहे.

दरम्यान, बंगालच्या उपसागरातील वादळे पूर्व भारतीय राज्यांना धडकण्याची शक्यता असून, तीनपेक्षा जास्त राज्यांमध्ये गारपिटीची शक्यता आहे. दक्षिण हरियाणा आणि लगतच्या उत्तर राजस्थानवर वरच्या परिसरात चक्रीय वाऱ्यांची रचना तयार होत आहे. याव्यतिरिक्त, खालच्या ट्रोपोस्फियरमध्ये दक्षिण किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश आणि आसपासच्या भागांवर वरच्या थरात चक्रीय वाऱ्यांची रचना आहे. उत्तर हरियाणा आणि आसपासच्या भागांवरही चक्रीय वाऱ्यांची रचना तयार होत आहे. उद्या, १७ ऑक्टोबर रोजी कोणकोणत्या राज्यात मुसळधार पाऊस बरसण्याचा अंदाज हवामान विभागाने नोंदवला आहे, जाणून घेऊया... हवामान विभागाच्या अंदाजानुसार, उद्या, १७ ऑक्टोबर रोजी उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली, राजस्थान, हरियाणा, उत्तराखंड, पंजाब, हिमाचल प्रदेश, जम्मू- काश्मीर, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, तेलंगणा आणि केरळ या १६ राज्यांमध्ये मुसळधार पाऊस आणि मेघगर्जनेसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्याचबरोबर, ताशी ८० किलोमीटर वेगापर्यंतच्या सोसाट्याच्या वाऱ्यांचा इशाराही देण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊ शकते.

# दुष्काळग्रस्त भागातील पशुपालकांसाठी दिलासा; चारा बियाणे वाटपाच्या अटी शिथिल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यात २०२६-२७ मध्ये कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या ३०४ तालुक्यांतील पशुपालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'च्या अटी शिथिल केल्या आहेत. चारा टंचाईवर मात करण्यासाठी या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थी तसेच शेतकरी गटांना अतिरिक्त चारा बियाणे व ठोंबे वाटप करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ही सवलत केवळ २०२६-२७ या वर्षासाठी लागू राहणार आहे.

योजनेच्या ९ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, वैयक्तिक लाभार्थ्याकडे स्वतःचे किमान तीन ते चार पशुधन असणे आवश्यक होते. मात्र, दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन ही किमान पशुधनाची अट चालू वर्षासाठी शिथिल करण्यात आली आहे.

वैयक्तिक लाभार्थ्यांना ४ हजार रुपयांचे चारा बियाणे

योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना एक हेक्टर क्षेत्राच्या मर्यादित १०० टक्के अनुदानावर चार हजार रुपये किमतीचे चारा बियाणे देण्यात येते. संबंधित लाभार्थ्याकडे चारा उत्पादनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्यास आणि प्रथमच लाभ मागणाऱ्या नवीन अर्जदारांची मागणी प्रलंबित नसल्यास, एकापेक्षा अधिक वेळा लाभ देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

शेतकरी गटांना २० हजार रुपयांपर्यंत लाभ

शेतकरी समूह किंवा गटांना पाच हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत १०० टक्के अनुदानावर २० हजार रुपये किमतीचे चारा बियाणे देण्यात येते. चारा उत्पादनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असलेल्या गटांना, प्रथमच लाभ मागणाऱ्या अर्जदारांची मागणी पूर्ण झाल्यानंतर, उपलब्धतेनुसार एकापेक्षा अधिक वेळा बियाणे वाटप करता येणार आहे. सर्वसाधारणपणे ही योजना वर्षातून एकदाच राबविण्यात येते. मात्र, सध्याची दुष्काळी परिस्थिती विचारात घेऊन चारा उत्पादनासाठी आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असल्याची खातरजमा केल्यानंतर अतिरिक्त लाभ देण्याची सवलत देण्यात आली आहे. यासाठी संबंधित उपायुक्त पशुसंवर्धन यांनी पाणीसाठा उपलब्ध असल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे. तसेच, प्रथमच लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नवीन अर्जदारांची मागणी प्रलंबित नसल्याची खात्री करण्याचे निर्देश जिल्हा व विभागीय कार्यालयांना देण्यात आले आहेत. योजनेबाबत अधिक माहितीसाठी पशुपालकांनी १९६२ या कॉल सेंटर क्रमांकावर किंवा ९०६३१४२२९९ या व्हॉट्सप चॅटबॉट क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे. दुष्काळजन्य परिस्थितीत पशुपालकांना आर्थिक दिलासा देणे आणि चाऱ्याचा तुटवडा जाणवू न देणे यासाठी शासन कटिबद्ध आहे. अटी शिथिल केल्यामुळे सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त चारा उत्पादन घेता येईल. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, असे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी सांगितले.

## फेब्रुवारी-मार्च २०२७ मधील दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी सवलत; राज्य मंडळाच्या पुढील सूचना निर्गमित होणार

# सोलापूरच्या दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या दहावी व बारावीच्या परीक्षांसाठी परीक्षा शुल्क माफ करण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांकडून पुढील आदेश होईपर्यंत परीक्षा शुल्क न घेता ऑनलाइन आवेदनपत्रे भरून घेण्याची कार्यवाही करण्यात येणार असून, याबाबत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून सविस्तर सूचना निर्गमित होणार आहेत, अशी माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली.

मदत व पुनर्वसन विभागाच्या २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने विशेष उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीचाही समावेश आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) परीक्षा घेण्यात येणार आहेत.

### सोलापूर जिल्ह्यात दहावीचे ७२ हजार १७०, तर बारावीचे ४९ हजार ६६२ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट होणार

या परीक्षांसाठी ऑनलाइन आवेदनपत्रे भरण्याची प्रक्रिया सुरू असून, दुष्काळग्रस्त भागातील पात्र विद्यार्थ्यांना शुल्क माफीचा लाभ मिळावा, यासाठी पुढील आदेश होईपर्यंत परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्रे भरून घेण्यात येणार आहेत. यासंदर्भात राज्य मंडळाकडून पुढील सविस्तर सूचना निर्गमित करण्यात येतील. परीक्षा शुल्काअभावी कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये, याची दक्षता घेण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी केले आहे.



सोलापूर जिल्ह्यात ग्रामीण व शहर विभाग मिळून फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या परीक्षेसाठी दहावीचे एकूण ७२ हजार १७० विद्यार्थी प्रविष्ट होणार आहेत. यामध्ये ३८ हजार ७१७ मुले व ३३ हजार ४५३ मुलींचा समावेश आहे. बारावीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यातून एकूण ४९ हजार ६६२ विद्यार्थी प्रविष्ट होणार असून, त्यामध्ये २५ हजार ९५१ मुले व २३ हजार ७११ मुली आहेत.

ग्रामीण भागातील तालुकानिहाय विद्यार्थी संख्या : सोलापूर ग्रामीण भागातील ११ तालुक्यांमध्ये दहावीच्या परीक्षेसाठी पंढरपूर तालुक्यात सर्वाधिक ७ हजार ९५२ विद्यार्थी, माळशिरस ७ हजार ३५९, बार्शी ६ हजार ७५, सांगोला ५ हजार ७२८, माढा ५ हजार ५९७, उत्तर सोलापूर ५ हजार १५२, अक्कलकोट ४ हजार ७२२, मोहोळ ४ हजार ६०२, दक्षिण सोलापूर ४ हजार ३४३, मंगळवेढा ३ हजार ८२४ आणि करमाळा तालुक्यात ३ हजार ३५५ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट होणार आहेत. ग्रामीण भागातील दहावीच्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ५८ हजार ७०९ आहे. बारावीच्या परीक्षेसाठी ग्रामीण भागात पंढरपूर तालुक्यात ६ हजार १५७, माळशिरस ४ हजार ९८२, बार्शी ४ हजार ७९१, सांगोला ४ हजार १५२, माढा ३ हजार ९१८, उत्तर सोलापूर २ हजार ७८८, मोहोळ २ हजार ७६४, मंगळवेढा २ हजार ५५३, दक्षिण सोलापूर २ हजार ५०८, अक्कलकोट २ हजार ४२३ आणि करमाळा तालुक्यात २ हजार ६१ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट होणार आहेत. ग्रामीण भागातील बारावीच्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ३९ हजार ९७ आहे.

सोलापूर शहर विभागातील विद्यार्थी संख्या : शहरातील यूआरसी-१ अंतर्गत दहावीचे ७ हजार ५८२ व बारावीचे ५ हजार ५८६ विद्यार्थी, तर यूआरसी-२ अंतर्गत दहावीचे ५ हजार ८७९ व बारावीचे ४ हजार ९७९ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट होणार आहेत.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### शासनाचा दिलासा

राज्यात २०२६-२७ मध्ये कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या ३०४ तालुक्यांतील पशुपालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'च्या अटी शिथिल केल्या आहेत. चारा टंचाईवर मात करण्यासाठी या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थी तसेच शेतकरी गटांना अतिरिक्त चारा बियाणे व ठोंबे वाटप करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ही सवलत केवळ २०२६-२७ या वर्षासाठी लागू राहणार आहे. योजनेच्या ९ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, वैयक्तिक लाभार्थ्याकडे स्वतःचे किमान तीन ते चार पशुधन असणे आवश्यक होते. मात्र, दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन ही किमान पशुधनाची अट चालू वर्षासाठी शिथिल करण्यात आली आहे. योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना एक हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत १०० टक्के अनुदानावर चार हजार रुपये किमतीचे चारा बियाणे देण्यात येते. संबंधित लाभार्थ्याकडे चारा उत्पादनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्यास आणि प्रथमच लाभ मागणाऱ्या नवीन अर्जदारांची मागणी प्रलंबित नसल्यास, एकापेक्षा अधिक वेळा लाभ देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच मदत व पुनर्वसन विभागाच्या २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने विशेष उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीचाही समावेश आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) परीक्षा घेण्यात येणार आहेत.

# महाराष्ट्रात लोकशाही पत्रकार महासंघाची नवी दिशा; प्रदेशाध्यक्षपदी किशोर दादा पवार यांच्यावर जबाबदारी

## राष्ट्रीय निवड समिती आणि महाराष्ट्र प्रदेश कोर कमिटीची संयुक्त मान्यता; पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी लढा देण्यासह राज्यभर सक्षम संघटन उभारण्याचा निर्धार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : लोकशाही पत्रकार महासंघ, भारताच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी मा. श्री. किशोर दादा पवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या मान्यतेने राष्ट्रीय निवड समिती तसेच महाराष्ट्र प्रदेश कोर कमिटीने त्यांच्या नावाला संयुक्तपणे एकमताने मंजुरी दिली. या निवडीमुळे महाराष्ट्रातील पत्रकारांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे, पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटित लढा उभारणे आणि राज्यभर महासंघाचे मजबूत संघटनात्मक जाळे निर्माण करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी किशोर दादा पवार यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. या निवडीकडे केवळ एका पदावरील नियुक्ती म्हणून नव्हे, तर महाराष्ट्रातील पत्रकारांच्या प्रश्नांना संघटित व्यासपीठ मिळवून देण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिले जात आहे.



या निवड प्रक्रियेत लोकशाही पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्यकारिणीचे प्रमुख सदस्य तथा मुंबईचे निवृत्त न्यायाधीश डॉ. संतोषकुमार जयस्वाल, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रतापराव साळुंखे, राष्ट्रीय महामंत्री टी. माधव, राष्ट्रीय संघटनमंत्री ज्ञानेश्वरजी बुधवंत, राष्ट्रीय कायदेशीर सल्लागार तथा मुंबई उच्च न्यायालयाचे वकील रमाकांत पाटील, तसेच महाराष्ट्र प्रदेश कोर कमिटीचे सदस्य डॉ. अनिलजी पाटील, सनम पाटील,शेखर पाटील साहेब, हलीमाताई शेख, पंचशीला कांबळे आणि रेणुका ताई जयस्वाल यांनी किशोर दादा पवार यांच्या नावाला सर्वानुमते मंजुरी दिली. त्यानंतर त्यांच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदावरील निवडीची घोषणा करण्यात आली.

किशोर दादा पवार गेल्या सहा ते सात वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असून, जनहिताचे प्रश्न, सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या, ग्रामीण भागातील अडचणी, सामाजिक विषय तसेच शासन-प्रशासनाशी संबंधित प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांच्या समस्या समजून घेणे, त्यांना योग्य व्यासपीठ मिळवून देणे आणि संबंधित यंत्रणांपर्यंत त्यांचा आवाज पोहोचविणे, या दिशेने त्यांनी काम केले आहे. राज्यातील विविध भागांतील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी आणि स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांशी त्यांचे संपर्कजाळे निर्माण झाले आहे. या अनुभवाचा उपयोग करून पत्रकारितेतील प्रश्नांना व्यापक स्वरूप देणे आणि पत्रकारांना संघटित करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारणे, हे त्यांच्या आगामी कार्यकाळातील महत्त्वाचे उद्दिष्ट राहणार आहे.

आजच्या काळात पत्रकारांना वृत्तसंकलन करताना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. ग्रामीण आणि दुर्गम भागातील पत्रकारांना मूलभूत सुविधा, व्यावसायिक सुरक्षितता, कायदेशीर मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती आणि प्रशासकीय स्तरावर आपल्या समस्या मांडण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे. विशेषतः ग्रामीण भागातील पत्रकार, लहान वृत्तपत्रे, डिजिटल माध्यमे तसेच स्थानिक स्तरावर काम करणाऱ्या पत्रकारांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून किशोर दादा पवार पत्रकारांचे प्रश्न संघटितपणे मांडण्यावर भर देणार आहेत. पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी पाठपुरावा करणे, अडचणींचे संकलन करून त्या संबंधित विभागांपर्यंत पोहोचविणे, आवश्यकतेनुसार कायदेशीर मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि पत्रकारांच्या सन्मान व सुरक्षिततेसाठी संस्थात्मक पातळीवर काम करणे, यांना त्यांच्या कार्यात प्राधान्य दिले जाणार आहे.

लोकशाही पत्रकार महासंघाचे संघटन राज्याच्या प्रत्येक विभागात, जिल्ह्यात, तालुक्यात आणि ग्रामीण भागात अधिक सक्षम करण्याचा निर्धार किशोर दादा पवार यांनी व्यक्त केला आहे. केवळ पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांपुरते संघटन मर्यादित न ठेवता, प्रत्येक पदाधिकाऱ्याने पत्रकारांच्या प्रश्नांसाठी प्रत्यक्ष काम करावे, स्थानिक पातळीवरील समस्या प्रदेश स्तरापर्यंत पोहोचाव्यात आणि त्या सोडविण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा व्हावा, अशी कार्यपद्धती विकसित करण्यावर त्यांचा भर राहणार आहे. जिल्हा व तालुका स्तरावर कार्यक्षम कार्यकारिणी उभारणे, नियमित बैठका घेणे, पत्रकारांच्या प्रश्नांचा अहवाल तयार करणे, संघटनात्मक समन्वय वाढविणे आणि प्रत्येक भागातील पत्रकारांना महासंघाशी जोडणे, या माध्यमातून राज्यव्यापी संघटन अधिक गतिमान करण्याचे नियोजन आहे.

पत्रकारांना शासनाच्या विविध विभागांशी संबंधित कामकाज, नियम, सुविधा आणि उपलब्ध योजनांची माहिती वेळेवर मिळणे महत्त्वाचे आहे. अनेकदा माहितीअभावी किंवा योग्य मार्गदर्शन नसल्यामुळे पात्र व्यक्ती योजनांपासून वंचित राहतात. पत्रकारांच्या बाबतीतही शासकीय योजना, लागू असलेल्या सवलती, विमा संरक्षण, आरोग्यविषयक सुविधा आणि इतर पात्रताधारित लाभांची माहिती सर्वांपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे. यासाठी संबंधित शासकीय विभागांशी समन्वय साधणे, अधिकृत योजनांची माहिती संकलित करून जिल्हा व तालुका स्तरावरील पत्रकारांपर्यंत पोहोचविणे, पात्र पत्रकारांना अर्ज प्रक्रिया समजावून सांगणे आणि त्यांच्या अडचणींचा पाठपुरावा करणे, या दिशेने महासंघ काम करणार आहे. कोणत्याही योजनेचा लाभ संबंधित नियम व पात्रतेनुसार मिळावा, यासाठी पत्रकारांना योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

लोकशाही पत्रकार महासंघ हा पत्रकार आणि शासन-प्रशासन यांच्यातील प्रभावी दुवा म्हणून काम करेल. पत्रकारांच्या समस्या केवळ ऐकून न घेता त्या समजून घेणे, त्यांचे दस्तऐवजीकरण करणे, संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविणे आणि न्याय्य मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा करणे, हे आमचे प्रमुख उद्दिष्ट असेल, अशी भूमिका किशोर दादा पवार यांनी व्यक्त केली.

पत्रकारितेबरोबरच किशोर दादा पवार हे अनेक वर्षांपासून राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहेत. विविध संघटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समाजातील विविध घटकांशी समन्वय साधण्याचा अनुभव मिळविला आहे. संघटन उभारणी, लोकांशी संपर्क, प्रश्नांचे संकलन आणि संबंधित स्तरावर पाठपुरावा या बाबींचा अनुभव त्यांच्या नव्या जबाबदारीत उपयुक्त ठरणार आहे. पत्रकार संघटनेचे काम करताना पत्रकारितेची स्वतंत्र ओळख, व्यावसायिक प्रतिष्ठा आणि संघटनेची विश्वासार्हता जपणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही पत्रकाराला त्याच्या न्याय्य प्रश्नांसाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, तसेच संघटनेचे काम पारदर्शक, शिस्तबद्ध आणि सर्वसमावेशक पद्धतीने व्हावे, यासाठी प्रयत्नशील राहण्याचा त्यांचा मानस आहे.

किशोर दादा पवार हे सेवा सोशल वेल्फेअर ग्लोबल फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष आहेत. या फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविण्याच्या दिशेने काम केले जात आहे. महिला सक्षमीकरण, रोजगाराभिमुख प्रशिक्षण, ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी, सामाजिक मदत आणि जनहिताच्या उपक्रमांवर संस्थेचा भर आहे. ग्रामीण भागातील महिलांना कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि गरजू नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती मिळवून देणे, या क्षेत्रांत सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडवून आणण्याची भूमिका त्यांनी स्वीकारली आहे. पत्रकारिता, संघटनात्मक नेतृत्व आणि सामाजिक कार्य या तिन्ही क्षेत्रांतील अनुभवाचा समन्वय साधत समाजातील विविध घटकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी काम करण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार आहे.

महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर राज्यभरातील पत्रकारांना एकत्र आणणे, संघटनेत सक्रिय सहभाग वाढविणे, पत्रकारांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणे आणि महासंघाला विश्वासार्ह, कार्यक्षम व परिणामकारक व्यासपीठ म्हणून विकसित करणे, हे किशोर दादा पवार यांच्यासमोरील प्रमुख आव्हान असेल. पत्रकारांचे हक्क, सन्मान, सुरक्षितता, व्यावसायिक प्रश्न आणि शासकीय योजनांबाबत योग्य माहिती या मुद्द्यांवर नियोजनबद्ध काम केल्यास राज्यातील पत्रकारांना संघटित ताकद मिळू शकते. या उद्दिष्टांसाठी राष्ट्रीय नेतृत्व, महाराष्ट्र प्रदेश कोर कमिटी, जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि पत्रकार बांधवांच्या सहकार्याने व्यापक उपक्रम राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

किशोर दादा पवार यांच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदावरील निवडीमुळे लोकशाही पत्रकार महासंघाच्या राज्यव्यापी विस्ताराला नवी दिशा मिळेल, तसेच पत्रकारांच्या प्रश्नांना अधिक संघटित आणि प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी नवे पर्व सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सीना-माढा योजना पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्यासाठी आमदार अभिजीत आबा पाटील आक्रमक; जलसंपदा मंत्र्यांकडे ठोस मागणी!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांची पाण्यासाठीची गरज लक्षात घेऊन आमदार अभिजीत आबा पाटील यांनी जलसंपदा मंत्री मा. श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेत सीना-माढा उपसा सिंचन योजनेच्या प्रलंबित प्रश्नांवर ठोस भूमिका मांडली.

योजनेची क्षमता ४२५ क्यूसेक असल्याचा उल्लेख असताना प्रत्यक्ष पाणीपुरवठा केवळ २२० क्युसेक मर्यादित राहत असल्याने ही तफावत दूर करून योजना पूर्ण क्षमतेने सुरू करण्याची मागणी आमदार पाटील यांनी केली. पाईपलाईनची दुरुस्ती, मोटारमधील तांत्रिक बिघाड तातडीने दूर करणे आणि उपलब्ध राखीव पाण्याचा पूर्ण क्षमतेने वापर करणे, या मुद्द्यांवर त्यांनी जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधले. केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष पाणी शेतापर्यंत पोहोचले पाहिजे, ही ठाम भूमिका मांडत कालवा सल्लागार समितीची बैठक तातडीने घेऊन संबंधित विभागांना कालबद्ध कार्यवाहीचे निर्देश देण्याची मागणीही करण्यात आली.

माढा तालुक्यातील शेतकऱ्यांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागू नये, शेतीला वेळेत पाणी मिळावे आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी आमदार अभिजीत आबा पाटील यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू आहे.

# सलगर येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : सलगर येथे अमोल दादा पुटगे मित्रपरिवार यांच्या वतीने धम्म चक्र प्रवर्तन दिन माझ्या समाज बांधव यांच्यासोबत मोठ्या उत्साहात साजरा केला.

समाजातील जेष्ठ नागरीक यलप्पा पुटगे सर,चिंचल भगळे,बाबुराव पुटगे,मल्लिकार्जुन धसाडे,कल्याणी भगळे,शिवकरण शिंगे,यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून बुद्ध प्रतिमेला फुलांचा वर्षाव केला...

धम्मचक्र प्रवर्तन दिन हा बौद्ध धम्माच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र दिवस आहे.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर परमपूज्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती.हा दिवस संपूर्ण जगभरात आणि विशेषतःमहाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने आणि आदराने साजरा केला जातो..

'धम्मचक्र प्रवर्तन' म्हणजे बौद्ध धम्माच्या विचारांचे व समतेच्या चक्राची सुरुवात करणे होय.बाबासाहेबांनी या दिवशी भारतात लुप्त झालेल्या बौद्ध धम्माला पुन्हा संजीवनी दिली...

यावेळी समाजातील लहान बाल गोपाळापासून,युवा बांधव,जेष्ठ नागरिक,माता बहिणी उपस्थित होते..



## ३ वर्षांत १,२०० शाळांतील ३ लाख विद्यार्थ्यांच्या नेत्रतपासणीचे उद्दिष्ट

## उपक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुढाकार

# 'बाल दृष्टी'मधून महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांच्या नेत्रआरोग्याला नवी दृष्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : फळा स्पष्ट दिसत नसल्याने अभ्यासात मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक नेत्रोपचार उपलब्ध करून देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आणि व्हिजन फाउंडेशन ऑफ इंडिया यांच्या समन्वयाने 'बाल दृष्टी' हा वेगळया प्रकारचा पहिला उपक्रम सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला आहे. तीन वर्षांच्या कालावधीत महापालिकेच्या १२०० शाळांमधील तीन लाख विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी करण्याचे उद्दिष्ट या उपक्रमातून निश्चित करण्यात आले आहे.

'बाल दृष्टी' उपक्रम अपवर्तनदोषाच्या निदान व उपचारांवर केंद्रित

'बाल दृष्टी' हा उपक्रम अपवर्तनदोषाच्या निदान व उपचारांवर केंद्रित असून, तो आयुष्मान भारत अंतर्गत शालेय आरोग्य व कल्याण कार्यक्रमाशी संलग्न आहे. मुलांना अनेकदा दृष्टी स्पष्ट नसल्याचे सांगता येत नाही. अशा वेळी ते फळ्याजवळ बसणे, वाचन टाळणे अथवा फळ्यावरील मजकूर हळूहळू उतरविणे अशा वर्तनातून अडचणी व्यक्त करतात. मात्र, या लक्षणांचा अर्थ अनेकदा अनवधान किंवा अभ्यासातील दुर्लक्ष असा लावला जातो. ही स्थिती वेळीच ओळखून विद्यार्थ्यांना उपचारांशी जोडण्यावर या उपक्रमात भर देण्यात आला आहे.

देशात अंदाजे ९३ लाख मुले दृष्टीबाधित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. 'इंडियन जर्नल ऑफ ऑफ्थॅल्मॉलॉजी'मधील २०२२ च्या अभ्यासानुसार, बालअंधत्वामुळे भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाचे सुमारे १ हजार ३०० कोटी रुपयांचे अप्रत्यक्ष नुकसान होते. अपवर्तनदोष आणि म्ब्लायोपिया ही बालांधत्वाची प्रमुख कारणे असून, ७५ टक्क्यांहून अधिक दृष्टीदोष टाळता अथवा उपचारांद्वारे सुधारता येऊ शकतात.

२२७ महापालिका शाळांमधील ४० हजार २७० विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी

फेब्रुवारी ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत 'बाल दृष्टी'अंतर्गत २२७ महापालिका शाळांमधील ४० हजार २७० विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी करण्यात आली. या शाळांमध्ये नोंद असलेल्या ५९ हजार १५० विद्यार्थ्यांपैकी ६८ टक्के विद्यार्थ्यांपर्यंत तपासणी पोहोचली आहे. तपासणी झालेल्यांमध्ये २० हजार ३९० मुले आणि १९ हजार ८८० मुलींचा समावेश असून, दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांचा सहभाग जवळपास समान आहे. तपासणीदरम्यान काही गंभीर नेत्रदोषही निदर्शनास आले आहेत. एका विद्यार्थ्याच्या एका डोळ्यात उणे ११.५० एसपीएच इतका निकटदृष्टीदोष आढळला, तर



काही विद्यार्थ्यांच्या नोंदी उणे १६ एसपीएचपर्यंत आल्या आहेत. शून्य हे सामान्य दृष्टीमापन मानले जाते, तर उणे ६ पासून उच्च निकटदृष्टीदोषाची स्थिती सुरू होते. या पातळीवर काही सेंटीमीटरपलीकडील दृश्यही धूसर दिसू शकते. एका विद्यार्थ्यास मोतीबिंदू असल्याचेही निदान झाले असून, घरात किंवा वर्गात लक्षात न आलेले अन्य नेत्रविकारही तपासणीमुळे समोर आले.

घरभेटी आणि शाळाभेटींद्वारे सातत्याने संपर्क

उपक्रमांतर्गत आतापर्यंत ३६१ विद्यार्थ्यांना चष्मे देण्यात आले आहेत. संशयित नेत्रविकार आढळलेल्या विद्यार्थ्यांना ताडदेव रोडवरील व्हिजन फाउंडेशन ऑफ इंडियाच्या कम्युनिटी आय क्लिनिकमध्ये सविस्तर तपासणीसाठी पाठविण्यात येते. या तपासणीनंतर चष्मा, तज्ज्ञ उपचार अथवा शस्त्रक्रियेची आवश्यकता निश्चित करण्यात येते. पालकांशी घरभेटी आणि शाळाभेटींद्वारे सातत्याने संपर्क ठेवून उपचार पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करण्यात येत आहे. आतापर्यंत चार विद्यार्थ्यांवर तिरळेपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. तपासणीत ३१ विद्यार्थ्यांना रंगदृष्टीदोष असल्याचे आढळले आहे. हा दोष दुरुस्त करता येत नसला, तरी त्याचे वेळेवर निदान झाल्यास पालक आणि शिक्षकांना अध्यापनपद्धतीत आवश्यक बदल करता येतात. विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाच्या आणि करिअरच्या निवडीबाबत योग्य मार्गदर्शन करण्यासही ही माहिती उपयुक्त ठरते.

लोअर परळ येथील गणपतराव कदम महापालिका शाळेत चौथीत शिकणाऱ्या नऊ वर्षांच्या वेदांत नेरुळकरला पहिल्या बाकावरूनही फळा वाचता येत नव्हता. तिरळेपणामुळे त्याला धडे समजून घेण्यात अडचणी येत होत्या आणि तो वर्गात अधिक अबोल होत होता. 'बाल दृष्टी'च्या तपासणीत त्याची स्थिती निदर्शनास आल्यानंतर जुलैमध्ये त्याच्यावर विनामूल्य तिरळेपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर तो फळा वाचू लागला असून, धडे समजून घेत प्रश्नांची उत्तरेही देत आहे. आपल्या मुलाला आता स्पष्ट दिसत असून तो अडचणीविना शिकत आणि मित्रांमध्ये आत्मविश्वासाने वावरत असल्याची भावना त्याच्या आईने व्यक्त केली आहे.

पुढील उपचारांसाठी पाठविण्यात आलेल्या १ हजार ९५० विद्यार्थ्यांपैकी ५४९ विद्यार्थी, म्हणजे सुमारे २८ टक्के विद्यार्थी, आतापर्यंत संबंधित दवाखान्यात पोहोचले आहेत. प्रत्येक संदर्भित विद्यार्थ्याचा शाळेतील प्राथमिक ओळखीपासून पुढील तपासणी, चष्मावाटप आणि उपचार पूर्ण होईपर्यंत मागोवा घेण्यावर आता विशेष भर देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रामाद्वारे तपासणी, संदर्भसेवा आणि घरभेटींद्वारे पाठपुरावा करणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिका व व्हिजन फाउंडेशन ऑफ इंडियाच्या पथकांच्या कार्याची दखल घेतली आहे. फळा दिसत नसलेल्या विद्यार्थ्यांची अडचण अनवधान समजली जाण्यापूर्वीच त्यांना आवश्यक नेत्रसेवेशी जोडण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्वपूर्ण ठरत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# खरीप २०२६ मध्ये ३.३२ लाख पीक विमा अर्ज; २.४१ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित

## सोयाबीनसाठी सर्वाधिक ४०.४६ कोटी रुपयांचा विमा हप्ता; एकूण विमा हप्ता ६६.४० कोटी रुपये

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : खरीप हंगाम २०२६ मध्ये पीक विमा योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा सहभाग नोंदविण्यात आला असून, विविध आठ पिकांसाठी एकूण ३ लाख ३२ हजार ६७० अर्ज प्राप्त झाले आहेत. या अर्जांद्वारे ३ लाख ९२ हजार ५४६ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी २ लाख ४१ हजार ८०६ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. पेरणी क्षेत्राच्या तुलनेत विमा संरक्षित क्षेत्राचे प्रमाण ६२ टक्के असून, या पिकांसाठी एकूण ६६.४० कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

सोयाबीनसाठी सर्वाधिक सहभाग

पीकनिहाय आकडेवारीनुसार सोयाबीन पिकासाठी सर्वाधिक ९४ हजार ४८७ अर्ज प्राप्त झाले आहेत. या पिकाचे १ लाख ३४ हजार ३१९ हेक्टर पेरणी क्षेत्र असून, त्यापैकी ८७ हजार १९५ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. पेरणी क्षेत्राच्या तुलनेत विमा संरक्षित क्षेत्राचे प्रमाण ६५ टक्के आहे. सोयाबीनसाठी ४०.४६ कोटी रुपयांचा एकूण विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

तूर पिकासाठी ७८ हजार ४१६ अर्ज प्राप्त झाले असून, ७६ हजार ४२६ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी ५९ हजार ९४५ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. या पिकाचे विमा संरक्षित क्षेत्राचे प्रमाण ७८ टक्के असून, एकूण विमा हप्ता २.५२ कोटी रुपये आहे.

मका पिकासाठी ५२ हजार ५१४ अर्ज प्राप्त झाले आहेत. ८२ हजार ८०५ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी ३३ हजार १०४ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले असून, त्याचे प्रमाण ४० टक्के आहे. या पिकासाठी ०.३३ कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

उडीद, मूग, भुईमूग आणि कांदा पिकांचाही समावेश

उडीद पिकासाठी ३२ हजार ४५४ अर्ज प्राप्त झाले आहेत. ४० हजार २६७ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी २० हजार ४ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले असून, त्याचे प्रमाण ५० टक्के आहे. या पिकासाठी १.०८ कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

मूग पिकासाठी ७ हजार ५३५ अर्ज प्राप्त झाले असून, ५ हजार ३४३ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी ३ हजार ८०६ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. या पिकाचे विमा संरक्षित क्षेत्राचे प्रमाण ७१ टक्के असून, विमा हप्ता ०.५१ कोटी रुपये आहे.

भुईमूग पिकासाठी १ हजार ८३९ अर्ज प्राप्त झाले आहेत. २ हजार ९८८ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी १ हजार २७ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले असून, त्याचे प्रमाण ३४ टक्के आहे. या पिकासाठी ०.२२ कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

बाजरी पिकासाठी ३८ हजार ६७८ अर्ज प्राप्त झाले असून, १७ हजार ५१९ हेक्टर पेरणी क्षेत्रापेक्षा अधिक म्हणजे २२ हजार ७४२ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित असल्याची नोंद आहे. त्यामुळे विमा संरक्षित क्षेत्राचे प्रमाण १३० टक्के दर्शविण्यात आले आहे. या पिकासाठी ०.३१ कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

कांदा पिकासाठी २६ हजार ७४७ अर्ज प्राप्त झाले असून, ३२ हजार ८७९ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी १३ हजार ९८४ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. विमा संरक्षित क्षेत्राचे प्रमाण ४३ टक्के असून, या पिकासाठी २०.९८ कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

एकूण ६६.४० कोटी रुपयांचा विमा हप्ता : खरीप २०२६ मध्ये पीकनिहाय प्राप्त अर्ज, पेरणी क्षेत्र, विमा संरक्षित क्षेत्र आणि विमा हप्ता यांची आकडेवारी पीक विमा योजनेतील शेतकऱ्यांच्या सहभागाचे चित्र स्पष्ट करते. एकूण आठ पिकांसाठी ३ लाख ३२ हजार ६७० अर्जांद्वारे २ लाख ४१ हजार ८०६ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. या सर्व पिकांसाठी एकूण ६६.४० कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

# श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे ८ तास गव्हाण बंद आंदोलन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : ऊस उत्पादक शेतकऱ्यांना यंदाच्या गळीत हंगामात प्रतिटन ५,००० रुपये दर मिळावा, तसेच साखरेची किमान विक्री किंमत (चडझ) प्रतिकिलो ५० रुपये आणि इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करावा, या मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने १५ ऑक्टोबर रोजी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर ८ तास गव्हाण बंद आंदोलन करण्यात आले.

ऊस दर जाहीर न करता गाळप सुरू करण्याच्या पार्श्वभूमीवर संघटनेने आक्रमक भूमिका घेत हे आंदोलन केले. ऊस उत्पादनासाठी लागणारी खते, मजुरी, मशागत, बियाणे, औषधे, डिझेल तसेच शेतीसाठी लागणाऱ्या इतर साहित्याच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यामुळे वाढत्या उत्पादन खर्चाचा विचार करून यंदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन ५,००० रुपये दर मिळणे आवश्यक असल्याची भूमिका संघटनेने मांडली.

**चेअरमन व कार्यकारी संचालकांचे ऊस दराबाबत तोडगा काढण्याचे लेखी आश्वासन; आंदोलन तात्पुरते स्थगित**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक आणि माजी खासदार राजू शेट्टी साहेब हे साखरेची एमएसपी प्रतिकिलो ५० रुपये आणि इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करण्याच्या मागणीसाठी आंदोलन करत आहेत. या दरवाढीमुळे साखर कारखान्यांच्या आर्थिक उत्पन्नाला हातभार लागू शकतो. त्यामुळे कारखान्यांनी राजू शेट्टी साहेब यांच्या आंदोलनाला पाठिंबा देऊन शेतकरी आणि साखर उद्योगाच्या हितासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले.

**राजकारणात युती–आघाडी कोणासोबतही असली, तरी ऊस दराच्या बाबतीत नो कॉम्प्रमाइज..! राजू शेट्टी साहेब मागतील तो दर मिळालाच पाहिजे!**
**– सचिन पाटील (शेतकरी नेते, स्वाभिमानी शेतकरी संघटना)**

१५ ऑक्टोबर रोजी झालेल्या ८ तासांच्या गव्हाण बंद आंदोलनानंतर श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आणि कार्यकारी संचालक यांनी ऊस दराचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी तोडगा काढण्यात येईल, असे लेखी पत्र दिले. या लेखी आश्वासनानंतर संघटनेने आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे.

मात्र, आंदोलन स्थगित केले असले तरी ऊस दराच्या प्रश्नावर संघटनेचे लक्ष कायम राहणार आहे. लेखी आश्वासनानुसार कारखाना व्यवस्थापनाने तातडीने ठोस निर्णय घेऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा. केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष दराचा तोडगा काढावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहणार असून, यंदा उसाला प्रतिटन ५,००० रुपये दर मिळवण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना ठाम आहे.

# २०२६ /२७ च्या गळीताची साखर श्री विठ्ठल -रुक्मिणी चरणी साखरेचा प्रसाद अर्पण; उर्वरित साखर मंदिर समितीकडे सुपूर्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा माढा मतदारसंघाची लोकप्रिय आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या सूचनेनुसार हो कारखान्याचे एमडी गायकवाड साहेब यांच्या व्यवस्थापनाखाली आज श्री रुक्मिणी मातेच्या चरणी साखरेचा प्रसाद अर्पण करण्यात आला तसेच उर्वरित साखर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडे जमा करण्यात आली. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या वतीने राबवण्यात आलेल्या या उपक्रमातून कुटुराया प्रती असलेले श्रद्धा आणि भक्ती भाव व्यक्त करण्यात आला. यावेळी मंदिर समितीचे सदस्य संभाजी राजे शिंदे यांनी दूरध्वनी द्वारे सूचना दिल्यानंतर मंदिर समितीने आवश्यक सहकार्य केले. प्रसंगी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक दिनकर (दाजी )चव्हाण, संचालक सिद्धेश्वर बंडगर साखर विक्री व्यवस्थापक महेश पाटील, चीप अकाउंटंट माने साहेब तसेच कारखान्याचे कर्मचारी उपस्थित होते.

आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कारखाना प्रशासनाच्या नियोजनानुसार पार पडलेल्या या उपक्रमाद्वारे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे असलेला समन्वय अधोरेखित विठुरायाच्या चरणी साखरेचा प्रसाद अर्पण करून उर्वरित साखर मंदिर समितीकडे सुपूर्द करण्यात आले या कृतीतून भक्ती भाव आणि सहकार्याची भावना व्यक्त झाली.

### मानव अधिकार आंदोलन संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

# कळंब तालुक्यात नवीन रेशनकार्ड धारकांना दोन वर्षांपासून धान्य मिळेना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब /प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील अनेक गावांमध्ये नवीन रेशनकार्ड धारकांना गेल्या दोन वर्षांपासून शासकीय स्वस्त धान्य दुकानातून धान्य मिळत नसल्याने गरीब कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. शासनाने अन्न सुरक्षा योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना नवीन रेशनकार्डचे वाटप केले असले तरी त्या कार्डवर धान्याचा कोटा मंजूर होत नसल्याने किंवा पुरवठा विभागाकडून स्वस्त धान्य दुकानदारांना धान्य उपलब्ध करून दिले जात नसल्याने लाभार्थ्यांना रिकाम्या हाताने परत जावे लागत आहे. अनेक ठिकाणी दुकानदार तुमचे नाव ऑनलाईन आले नाही किंवा कोटा आला नाही असे सांगून टाळाटाळ करत असल्याचा आरोप होत आहे. या गंभीर समस्येची दखल घेऊन नवीन रेशनकार्ड धारकांना तात्काळ



धान्य वितरण सुरू करावे या मागणीसाठी मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे यांनी कळंबचे तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,कळंब तालुक्यातील सर्व नवीन रेशनकार्ड धारकांची यादी तात्काळ ऑनलाईन करून त्यांना धान्य वितरणाचा कोटा मंजूर करावा, ज्या स्वस्त धान्य दुकानदारांकडून नवीन कार्ड धारकांना धान्य नाकारले जात आहे त्यांची चौकशी करून कारवाई करावी, ज्या लाभार्थ्यांना गेल्या महिन्यांचे धान्य मिळाले नाही त्यांचे थकीत धान्य एकत्रित वितरित करावे, जोपर्यंत नियमित धान्य वितरण सुरू होत नाही तोपर्यंत पर्यायी व्यवस्था करून गरीब कुटुंबांना दिलासा द्यावा, तसेच रेशन विभागातील आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे आवक जावक विभागामार्फतच घेण्यात यावीत अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. या मागण्यांवर तात्काळ कार्यवाही करून नवीन रेशनकार्ड धारकांना त्वरित धान्य मिळण्याबाबत आदेश द्यावेत अन्यथा मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.सदरील निवेदनावर हनुमंत भाऊ पाटुळे, भगवान कसबे यांची स्वाक्षरी आहे.

**शासकीय निवासी शाळेत उत्स्फूर्त साजरा** | **प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांचे प्रतिपादन**

# डॉ. आंबेडकरांच्या विचाराप्रमाणे खरे धम्मचक्र अनुवर्तन अशोक विजयादशमीला करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/गोंदिया : जगातील पहिले धम्मचक्र प्रवर्तन हे फक्त तथागत बुद्धांनी सारनाथ येथे आपल्या अनुयायांसोबत केले. नंतर हजारो वर्षानंतर चक्रवर्ती सम्राट अशोक यांनी शस्त्र त्यागून बुध्दांना शरण गेले. धम्माचा प्रसार व प्रचार केला. भारतातच नाही तर श्रीलंका, जपानच्या धरतीवर देखील आपल्या महेंद्र व संघमित्रा या मुलांना प्रसारासाठी पाठविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक क्रांतीची नांदी जागवण्यासाठी १३ आक्टोबर १९३५ ला 'हिंदू धर्मात जन्माला आलो पण हिंदू म्हणून मरणार नाही' अशी धर्मांतराची घोषणा केली. अनेक धर्माचा अभ्यास करून बौद्ध धमचा स्वीकार करून सम्राट अशोक यांच्या शस्त्र त्यागाचे महत्त्व समजून नागपूर येथे धम्माची दीक्षाभूमी घेतली. म्हणून डॉ. आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे खरे धम्म चक्र अनुवर्तन अशोक विजयादशमी...! ला केले पाहिजे. असे प्रतिपादन आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. ते मुख्य



मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली नीता भलमे पुष्करराज लांजेवार साधना पारधी आशिष शहारे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर निशा गभणे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रम हा अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री या ठिकाणी दुपारी १२.०० संपन्न झाला. प्रा. नंदागवळी पुढे म्हणाले- डॉ बाबासाहेब आंबेडकरांना सामाजिक क्रांती करायची होती. त्यासाठी धार्मिक विचारधारांचा अवलंब करून विज्ञानवादी बौद्ध धम्म स्वीकारला. तत्तकाळात १६ हजार धम्मदीक्षा सोहळाचे माहिती पत्रक काढून प्रचार करण्यात आला होता. नागपूर येथे तमात भारतातील ५ लाख लोकांसमोर महास्थवीर भदंत यांच्या साक्षीने बौद्ध धम्म स्वीकारला. यावेळी २२ प्रतिज्ञा व १० पारमिता या बाबासाहेबांनी ग्रहण करायला लावल्या. म्हणून धम्मचक्र अनुवर्तन दिवस हा सम्राट अशोक विजयादशमी या दिवशी करण्यात यावे. असे मार्मिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदीप ढवळे यांनी केले. तर यशस्वीतेसाठी संगिता कुंभरे व तुषार महाजन यांनी सहकार्य केले.

# भिवंडी तालुक्यात ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन व धम्म मेळाव्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी विचारांचा जागर, धम्मकार्याला प्रोत्साहन आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव अशा विविध उद्देशांनी भारतीय बौद्ध महासभा, भिवंडी तालुका यांच्या वतीने मंगळवार, दिनांक २० ऑक्टोबर २०२६ रोजी ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन व भव्य धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. भिवंडी तालुक्यातील कवाड येथील कृणाल फार्म हाऊस येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हा कार्यक्रम उत्साहात पार पडणार आहे.




या धम्म मेळाव्याचे विशेष आकर्षण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीशी संबंधित सोनबा येलवे यांचे नातू सदानंद येलवे आणि पणतू राजेश येलवे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बी. एच. गायकवाड उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा, भिवंडी तालुका अध्यक्ष ड. राजेश जाधव असणार असून, स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी भिवंडी तालुका महिला अध्यक्षा अश्विनीताई चन्ने सांभाळणार आहेत. या मेळाव्याचे संपूर्ण नियोजन महासभेच्या संस्कार विभाग, संरक्षण विभाग, प्रचार-प्रसार विभाग आणि पर्यटन विभाग यांच्या वतीने करण्यात आले आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून भिवंडी तालुक्यातील समता सैनिक दलाचे कार्यकर्ते, धम्मप्रचार व प्रसारासाठी उल्लेखनीय योगदान देणारे मान्यवर आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. या सन्मान सोहळ्याच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्त्यांच्या योगदानाची दखल घेण्याबरोबरच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे आणि नव्या पिढीमध्ये धम्मकार्याची प्रेरणा निर्माण करणे हा उद्देश आहे.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. हा ऐतिहासिक दिवस भारतीय बौद्ध समाजासाठी परिवर्तनाची प्रेरणा देणारा ठरला. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा प्रसार करीत आंबेडकरी विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला भिवंडी तालुक्यातील आंबेडकरी अनुयायी, बौद्ध उपासक-उपासिका, समता सैनिक दलाचे कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका सरचिटणीस संजय गायकवाड आणि महिला सरचिटणीस सरिता भोईर यांनी केले आहे.

# हुतात्मा वेद प्रकाश शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उमरगा येथील वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे प्रश्न आठ दिवसांत मार्गी न लागल्यास आंदोलन!

## अभाविप उमरगा शहर मंत्री समर्थ कुंभार यांचा आंदोलनाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), उमरगा शाखेच्या वतीने हुतात्मा वेद प्रकाश शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उमरगा येथील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांबाबत संस्थेच्या प्राचार्यांना निवेदन देण्यात आले.

या वसतिगृहात विद्यार्थ्यांना वीजव्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी, परिसराची स्वच्छता तसेच स्वच्छतागृहांच्या दुरवस्थेसारख्या विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. विद्यार्थ्यांना राहण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने त्यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे.

विद्यार्थी शिक्षणासाठी घरापासून दूर राहून आपले भविष्य घडवत असताना त्यांना वसतिगृहात मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागणे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या समस्यांची तातडीने दखल घेऊन विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, उमरगा शाखेच्या वतीने करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या :

१. वीजव्यवस्था : वसतिगृहातील वीजव्यवस्थेची तातडीने तपासणी करून विद्यार्थ्यांना नियमित वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा. २. स्वच्छता : संपूर्ण वसतिगृहाची तातडीने स्वच्छता करून परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नियमित व्यवस्था करण्यात यावी. ३. स्वच्छतागृहांची दुरुस्ती : वसतिगृहातील स्वच्छतागृहांची दुरवस्था दूर करून आवश्यक दुरुस्ती व नियमित स्वच्छतेची व्यवस्था करण्यात यावी. ४. पिण्याचे पाणी : विद्यार्थ्यांना स्वच्छ व पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात यावे. ५. सुरक्षित व आरोग्यदायी वातावरण : वसतिगृहातील खोल्या व संपूर्ण परिसराची तपासणी करून विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून द्यावे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागणे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे प्रशासनाने या समस्यांकडे दुर्लक्ष न करता वसतिगृहाची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कार्यवाही करून विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

> **येत्या आठ दिवसांत विद्यार्थ्यांचे प्रश्न मार्गी लावून आवश्यक सुविधा उपलब्ध करून न दिल्यास अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, उमरगा शाखेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा अभाविप उमरगा शहर मंत्री समर्थ कुंभार यांनी दिला.**
>
> **– समर्थ कुंभार**
> **(शहर मंत्री, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, उमरगा)**

### उपलब्ध पाणी जपून वापरण्याचे आवाहन

# पंढरपूरमध्ये एक दिवसाआड पाणीपुरवठा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्यात दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्या असून पाणी टंचाईची संकट अधिक गडद झालेली आहे पंढरपूर शहरात पाणीपुरवठा करणाऱ्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यातही अत्यल्प पाणी शिल्लक आहे. उपलब्ध पाणीसाठा केवळ १५ ते २० दिवस पुरेल एवढाच आहे. त्यामुळे पंढरपूर नगरपालिकेने १६ ऑक्टोबर पासून एक दिवसात पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत पंढरपूर नगरपालिकेचे मुख्य अधिकारी महेश रोकडे यांनी परिपत्रक काढले आहे.

नवीन नियोजनानुसार रेल्वे सोहळा वरील भागात १६ समर्थ पासून तर रेल्वे रुळाच्या वरील भागात उपनगरामध्ये २७ ऑक्टोबर पासून एक दिवसात पाणीपुरवठा करण्यात येणार आहे त्यामुळे नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून पंढरपूर नगरपालिकेस आव्हान मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केली आहे. दरम्यान पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बांधकामासाठी तसेच सदा टाकण्यासाठी पाण्याचा वापर करू नये अशी निर्देशित असे निर्देश नगरपालिकेने दिले आहेत. या सूचनाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. असा इशाराही परिपत्रकातून दिला आहे.

शहरातील उपलब्ध पाणी साठा मर्यादित असल्याने पाण्याचा अफवाई टाळावा, आणि पाणी जपून वापरावे असे आवाहन नगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# विंचूर-किसनवाडीत विहिरीत पडलेल्या बिबट मादीच्या बछड्याची सुखरूप सुटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : विंचूरजवळील किसनवाडी (कृष्णवाडी) येथे गुरुवारी, दि.१५ ऑक्टोबर पहाटे शेतातील विहिरीत पडलेल्या बिबट मादीच्या बछड्याची वनविभाग आणि बचाव पथकाने क्रेनच्या साहाय्याने सुखरूप सुटका केली. अंदाजे आठ ते नऊ महिन्यांच्या या बछड्याची वैद्यकीय तपासणी करून त्याला शासकीय वाहनाने निफाड वन उद्यानात हलविण्यात आले असून, वनविभागाकडून पुढील कार्यवाही सुरू आहे.

> **क्रेनच्या साहाय्याने वनविभागाची मोहीम यशस्वी; वैद्यकीय तपासणीनंतर बछड्याला निफाड वन उद्यानात हलविले**



गुरुवारी पहाटे नेहमीप्रमाणे शेतात गेलेल्या किसनवाडी येथील शेतकरी मधुकर तुकाराम सालकाडे यांना आपल्या शेतातील विहिरीतून हालचालींचा आवाज आला. त्यांनी विहिरीत डोकावून पाहिले असता बिबट्याचा बछडा पडल्याचे निदर्शनास आले. ही विहीर त्यांच्या मालकीच्या गट क्रमांक ८८/१ मध्ये असून, त्यांनी तत्काळ ग्रामस्थ आणि वनविभागाला याबाबत माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच वनविभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिमंडळ अधिकारी जयप्रकाश शिरसाठ, वनरक्षक विजय दोंदे, अंकुश गुंड आणि आधुनिक बचाव पथक निफाड यांनी घटनास्थळी पोहोचून बचावकार्य सुरू केले. क्रेनच्या साहाय्याने बछड्याला विहिरीबाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करून शासकीय वाहनाने निफाड वन उद्यानात नेण्यात आले. या बचाव मोहिमेत वाइल्ड लाइफ रेस्क्यू टीमचे आसिफ पटेल, सागर दुसिंग, विजय माळी, शरद चांदोरे, भारत माळी, मयूर गांगुर्डे, काशिनाथ माळी, सादिक शेख, वैभव दौंड आणि सोनू निहारे यांनी सहभाग घेतला.

विंचूर आणि किसनवाडी परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सध्या शेतीची मशागत, काढणी तसेच इतर महत्त्वाची कामे सुरू असल्याने शेतकरी व शेतमजुरांना जीव मुठीत धरून शेतात काम करावे लागत आहे. बिबट्याचा बछडा विहिरीत पडल्याची घटना समोर आल्यानंतर परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने परिसरात गस्त वाढवावी, तसेच बिबट्यांच्या वाढत्या वावरावर नियंत्रण मिळविण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. गरजेनुसार पिंजरे लावून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे. वनविभाग आणि बचाव पथकाच्या तत्परतेमुळे बिबट मादीच्या बछड्याची सुखरूप सुटका झाल्याने समाधान व्यक्त होत असले, तरी परिसरातील बिबट्यांच्या वाढत्या वावराचा प्रश्न कायम आहे.

# सोलापुरात ‘वर्थ कॅपिटल’च्या नव्या शाखेचे उद्‌घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




प्रतिनिधी/सोलापूर : वाहन कर्ज क्षेत्रातील अग्रगण्य आणि भारतीय रिझर्व्ह बँकेकडे (ठइख) नोंदणीकृत बिगर बँकिंग वित्तीय कंपनी (छइऋउ) असलेल्या ‘वर्थ कॅपिटल’ने महाराष्ट्रातील आपल्या विस्ताराला सुरुवात केली असून, सोलापूर येथे नवीन शाखेचे उद्घाटन करण्यात आले. बुधवार, १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जुळे सोलापूर येथील भगवती टॉवर्स, दावत चौक येथे हा उद्घाटन सोहळा पार पडला.

‘एम्पॉवरिंग मोबिलिटी, एनेबलिंग ड्रीम्स’ (वाहतुकीला बळ, स्वप्नांना दिशा) हे ब्रीदवाक्य घेऊन कार्यरत असलेल्या वर्थ कॅपिटलची ही नवीन शाखा सोलापूर आणि परिसरातील ग्राहकांच्या वाहन कर्ज व मालमत्ता वित्तपुरवठ्याच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

> **वाहन कर्ज आणि मालमत्ता कर्ज त्वरीत मिळणार**

सोलापूर शाखेच्या कामकाजाची जबाबदारी आरबीएच श्री. चंद्रकांत पाटील, बीएच श्री. प्रवीण ढवळे आणि त्यांची अनुभवी टीम सांभाळणार आहे. या शाखेचे उद्घाटन डॉ. नंदकुमार भुतडा (संचालक, आशीर्वाद मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल, पुणे) यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी वर्थ कॅपिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज) श्री. शिवप्रसाद भुतडा आणि मुख्य परिचालन अधिकारी (उजज) श्री. बी. एम. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

चौकट :

विविध प्रकारच्या वाहनांसाठी कर्ज सुविधा

वर्थ कॅपिटलच्या माध्यमातून ग्राहकांना कार व व्यावसायिक वाहने, ट्रॅक्टर तसेच प्रवासी वाहने आणि पिकअप वाहनांसाठी कर्ज सुविधा उपलब्ध होणार आहेत. ग्राहकांना सुलभ सेवा देण्याच्या उद्देशाने कंपनीकडून जलद कर्जमंजुरीसह विविध आर्थिक सुविधा पुरविण्यावर भर दिला जाणार आहे.

सोलापूरमधील नवीन शाखेमुळे परिसरातील वाहन खरेदीदार, व्यावसायिक आणि शेतकऱ्यांना वाहन वित्तपुरवठ्याच्या सुविधा अधिक सहजपणे उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्रातील विस्ताराच्या दृष्टीने सोलापूर शाखेची सुरुवात हा कंपनीसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

### युवा नेते भगीरथ दादा भालके यांच्या मार्गदर्शनाखाली

# नवरात्र महोत्सव निमित्त सरकोलीतील महिलांसाठी मोफत दर्शनीय यात्रा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : स्वर्गीय लोकनेते आमदार भारत नाना भालके फाउंडेशनच्या वतीने नवरात्र महोत्सवानिमित्त मौजे सरकोली तालुका पंढरपूर येथील सर्व महिलांसाठी मोफत देवदर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची माहिती फाउंडेशनच्या अध्यक्ष तथा पंढरपूर नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता ताई भालके यांनी दिली,

या यात्रेदरम्यान महिलांना श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर अक्कलकोट श्री तुळजाभवानी माता मंदिर तुळजाभवानी श्री मार्डी येथील देवस्थान आणि श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर पंढरपूर या पवित्र तीर्थक्षेत्राचे दर्शन घेता येणार आहे.

आज अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेऊन महिलांनी प्रसादाचा लाभ घेतला व या उपक्रमामुळे




महिलांना भक्तिभावाने देवदर्शन करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

# वाचनाने मेंदूची मशागत घडून येते : कवी अरुण इंगळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आजचा माणूस सोशल मीडियाच्या कचाट्यात सापडला आहे त्यामुळे त्याच्या डोक्यात हिणकस विचार येताहेत त्यासाठी पुस्तकांचे वाचन हाच एक पर्याय आहे. चांगली पुस्तके माणसाच्या आयुष्य घडविण्यात कारणीभूत ठरतात. जीवनाला चांगला आकार देण्यासाठी तुम्हाला तुमच्या विचारांमध्ये समृद्धी आणावी लागेल. त्यासाठी पुस्तके हाच एकमेव उपाय आहे. वाचनाने माणसांच्या मेंदूची मशागत घडून येते. तो सक्षम होतो म्हणून वाचनाची मनाशी पक्की खुणगाठ बांधली पाहिजे. असे प्रतिपादन प्रसिद्ध कवीअभिनेता अरुण इंगळे यांनी केले.

के. के. वाघ महाविद्यालय रानवड येथे गीताई ग्रंथालय विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्याप्रसंगी इंगळे बोलत होते. माणसाच्या जीवनात पुस्तकांचे महत्व त्यांनी वेगवेगळया उदाहरणांतून समोर ठेवले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अतुल गवारे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून आपले विचार व्यक्त केले, ते म्हणाले, आजचा युवक मोबाईलच्या नको तेवढा आहारी जाऊन आपल्या आयुष्याचे नुकसान करून घेतो आहे. आयुष्याचा दृष्टीकोन आपल्याला वाचन देतं. म्हणून तरुणांनी वाचन केलं पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रतिभा बाहेकर यांनी, प्रमुख पाहुण्यांची ओळख धनश्री खैरे हिने करून दिली. सूत्रसंचालन सृष्टी कुशारे तर आभार प्रदर्शन ग्रंथालय प्रमुख . मुकुंद बागुल यांनी केले. कार्यक्रमास आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रा. मिलींद पवार, डॉ. त्र्यंबक बाबळे, प्रा. स्मिता बनकर, प्रा. सुनीता शिरसाठ, प्रा. शीतल जगताप, प्रा. वैशाली शिंदे, डॉ. भावना पौळ, प्रा.बाळकृष्ण फडे, श्री. अनिल राजोळे, आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येनं उपस्थित होते.

### खामसवाडी येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात

### डॉ. कलाम यांच्या जयंतीनिमित्त प्रियदर्शनी वाचनालयात ग्रंथ प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# ग्रंथ हेच खरे गुरू, वाचनातूनच ज्ञानाची कवाडे उघडतात : बिभीषण शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे /खामसवाडी : भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती म्हणजेच वाचन प्रेरणा दिन मौजे खामसवाडी येथील प्रियदर्शनी सार्वजनिक वाचनालयात मोठ्या उत्साहात आणि आगळ्यावेगळ्या उपक्रमाने साजरा करण्यात आला.

दि. १५ऑक्टोबर रोजी सकाळी वाचनालयात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे अध्यक्ष श्री. बिभीषण शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांसाठी विशेष ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. सध्याच्या मोबाईल आणि सोशल मीडियाच्या युगात वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलपेक्षा पुस्तकांशी मैत्री करावी, या उद्देशाने वाचनालयाच्या वतीने या ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात डॉ. कलाम लिखित 'अग्निपंख', 'विंग्स ऑफ फायर', 'इंडिया '२०२०' सह विविध आत्मचरित्रे, प्रेरणादायी कथा, कादंबऱ्या, विज्ञानविषयक पुस्तके, स्पर्धा परीक्षा (चझडउ/णझडउ) मार्गदर्शनपर ग्रंथ, बालसाहित्य असे ५०० हून अधिक ग्रंथ मांडण्यात आले होते.

शाळेतील विद्यार्थ्यांना प्रत्येक ग्रंथाची ओळख ग्रंथपाल एकनाथ घाटुळे यांनी करून दिली. अनेक विद्यार्थ्यांनी यावेळी वाचनालयाचे सभासदत्वही घेतले. यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष बिभीषण शेळके म्हणाले, डॉ. कलाम हे केवळ राष्ट्रपती नव्हते, तर ते एक महान शिक्षक होते. त्यांनी नेहमीच विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्यास सांगितले. पुस्तकांशिवाय माणूस घडू शकत नाही. आजच्या कार्यक्रमामुळे



विद्यार्थ्यांमध्ये नक्कीच वाचनाची आवड निर्माण होईल.

या कार्यक्रमास वाचनालयाचे कोषाध्यक्ष श्री. दत्तू यादव, सचिव श्री. प्रदीप जोशी, जेष्ठ सदस्य श्री. विजय देशमाने, श्री. शांतलिंग गोरे, ग्रंथालय कर्मचारी लिपिक श्री. एकनाथ घाटोळे, रवींद्र पाटील, दत्ता भराटे, दीपक सुरवसे, गोपाळ शेळके आदी ग्रामस्थ, पालक व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव प्रदीप जोशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन ग्रंथपाल एकनाथ घाटुळे यांनी केले.